# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११०१८

क क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.२७)**

(माहे ऑगस्ट २०१९ ची मासिक सभा)

दिनांक: ०७/०८/२०१९ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभग समितीची माहे ऑगस्ट २०१९ ची मासिक सभा बुधवार दिनांक ०७/०८/२०१९ रोजी सकाळी १२.०० वाजता क क्षेत्रिय कार्यालयाचे “श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह” येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा.नगरदस्य/ सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.बोइनवाड यशोदा प्रकाश | सभापती |
| २) | मा.अश्विनी संतोष जाधव | सदस्या |
| ३) | मा.लांडगे रवि लक्ष्मण | सदस्य |
| ४) | मा.लांडगे राजेद्र किसनराव | सदस्य |
| ५) | मा.लोंढे नम्रता योगेश | सदस्या |
| ६) | मा.राहुल हनुमंतराव भोसले | सदस्य |
| ७) | मा.समीर मोरेश्वर मासुळकर | सदस्य |
| ८) | मा.धावडे गोपीकृष्ण भास्कर | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्री.अण्णा बोदडे-क्षेत्रिय अधिकारी, श्री.दिलीप आढारी-प्रशासन अधिकारी, श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.नितीन देशमुख- कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.कांबळे बी.बी.सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री.वाईकर-उपअभियंता ज.नि., श्री.विनायक माने-उपअभियंता-स्थापत्य, श्री.बाळु लांडे-उपअभियंता विद्युत, इ.अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/सदस्या व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करून सभा कामकाज सुरू करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेण्यात आले.

विषय क्र. १ : मा. रवि बाबासाहेब लांडगे यांचा विषय
प्रभाग क्र. ०६ शंभुराजे कॉलनी मधुबन सोसायटी, कृष्णमंदिर समोर नव्याने झालेल्या कॉलनीचे नामकरण देणेबाबत.

विषय क्र. २ : मा.अश्विनी संतोष जाधव यांचा विषय
बालघरे वस्तीमधील रस्त्याचे नामकरण करणेबाबत.

विषय क्र. ३ : मा.राहुल हनुमंतराव भोसले यांचा विषय
प्रभाग क्र.९ मधील खराळवाडी उर्दू शाळेजवळील नाल्यावरील मुतारी पाडणेबाबत.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक: मा.समीर मोरश्वर मासुळकर                अनुमोदक: मा.राहुल हनुमंतराव भोसले

भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री मा.सुषमा स्वराज यांचे दुखद दिधन झाले आहे. त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करून आजची सभा तहकुब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.
(उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.सभापती** – आज होणा-या सभा दिनांक ०४/०९/२०१९ रोजी ११.५५ पर्यंत तहकुब करण्यात येत आहेत.

सही/-
(बोइनवाड यशोदा प्रकाश)
सभापती (क प्रभाग समिती)

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय कार्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११०१८

क क्षेत्रीय कार्यालय

**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.२७)**

(दि. ०७/०८/२०१९ रोजीची तहकुब सभा)

दिनांक: ०४/०९/२०१९ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभग समितीची माहे ऑगस्ट २०१९ ची दिनांक ०७/०८/२०१९ रोजी तहकुब करणेत आलेली मासिक सभा बुधवार दिनांक ०४/०९/२०१९ रोजी सकाळी ११.५५ वाजता क क्षेत्रिय कार्यालयाचे "श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृह" येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा.नगरदस्य/ सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.बोइनवाड यशोदा प्रकाश | सभापती |
| २. | मा.लोंढे नम्रता योगेश | सदस्या |
| ३. | मा.गीता सुशिल मंचरकर | सदस्य |
| ४. | मा.राहुल हनुमंतराव भोसले | सदस्य |
| ५. | मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर | सदस्या |
| ६. | मा.समीर मोरेश्वर मासुळकर | सदस्य |

याशिवाय श्री.अण्णा बोदडे-क्षेत्रिय अधिकारी, श्री.दिलीप आढारी-प्रशासन अधिकारी, श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.नितीन देशमुख-कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.कांबळे बी.बी.सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री.वाईकर-उपअभियंता ज.नि., श्री.बाळु लांडे-उपअभियंता विद्युत, श्री.महेश बरिदे, श्री.विनायक माने, श्री.वैभव पुसाळकर – उपअभियंता स्थापत्य, श्रीम.केदारी अ.अ.- क्रिडा पर्यवेक्षक, श्री.माने एस.डी.-कनिष्ठ अभियंता स्थापत्या इ.अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/सदस्या व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करून सभा कामकाज सुरू करणेस अनुमती दिली.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ७ | विषय क्रमांक | : | १ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | क प्रशासन/ लेखा |
| सुचक | : | मा.समीर मासुळकर | अनुमोदक | : | मा. वैशाली घोडकर |

संदर्भ : मा.क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक इक्षेका/प्रशा/४/कावि/७०/२०१९ दिनांक २९/०७/२०१९

मनपाच्या सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रक तयार करीत असताना क क्षेत्रिय प्रशासन विभागा करीता इतर खर्च या लेखाशिर्षामध्ये र.रु. १७,०००/- तरतूद करणेत आलेली आहे. सदर तरतूद मधून सन २०१८-१९ ची इतर खर्चाची बिले खर्ची टाकणेत आलेली आहेत. त्यामुळे माहे जुलै २०१९ अखेर र.रु. ३६६/- तरतूद शिल्लक आहे. त्यामुळे सदरची तरतुद कमी पडणार आहे. त्याकरीता छपाई या लेखाशिर्षावर र.रु. ६०,०००/- तरतूद असून त्या पैकी र.रु. ५०,०००/- तरतूद इतर खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ८ | | विषय क्रमांक | : | २ |
| दिनांक | : ०४/०९/२०१९ | | विभाग | : | क प्रशासन/ लेखा |
| सुचक | : मा.राहुल हनुमंतराव भोसले | | अनुमोदक | : | मा.गीता सुशिल मंचरकर |

संदर्भ : मा.क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्रमांक इक्षेका/प्रशा/३/कावि/३२३/२०१९ दिनांक ३१/०७/२०१९

पेठ क्र.२ इंद्रायणीनगर येथील भाजी मंडई गाळे वितरणाबाबत अटो क्लस्टर येथे दिनांक ६/२/२०१९ रोजी बैठक झाली होती. सदर बैठकीमध्ये मनपाने प्रसिध्द केलेल्या प्रभाग कार्यालया अंतर्गत येणाऱ्या पेठ क्र.२ इंद्रायणीनगर येथील भाजी मंडई गाळे/ ओटे सध्यस्थितीत जे व्यावसायीक वापरत आहेत त्यांनाच देण्यात यावे असे ठरले आहे. त्यानुसार त्या त्या प्रभाग स्तरावर स्थानिक प्रशासनाने बसणा-या भाजी विक्रत्यांचे सर्व्हेक्षण करून अंतिम यादी करावी व त्यास प्रभाग समितीची मान्यता घेउन भुमिजिंदगी विभागाकडे सादर करावे असे मा.आयुक्त यांचे पत्र क्रं.भूजि/३/कवि/१४४ /२०१९ दिं.०६/०६/२०१९ अन्वये कळविलेले आहे. तसेच सदर विषयास मा.स्थायी समिती सभा ठराव क्रं.४६९४ दिंनाक २८/२/२०१९ व ठराव क्रं.४६९७ दिंनाक २८/२/२०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रभाग कार्यालया अंतर्गत सदर प्रभागातील भाजी/ फळ विक्रेते यांचे सर्व्हेक्षण करणेत आलेले असून त्याची यादी (प्रपत्र अ) तयार करणेत आलेली आहे. सदरची यादी भुमि जिंदगी विभागाकडे सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ९ | | विषय क्रमांक | : | ३ |
| दिनांक | : ०४/०९/२०१९ | | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : मा.राहुल हनुमंतराव भोसले | | अनुमोदक | : | मा.गीता सुशिल मंचरकर |

संदर्भ : मा.रवि बाबासाहेब लांडगे यांचे दि. ०७/०८/२०१९ रोजीचे पत्र मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र.०६ शंभुराजे कॉलनी मधुबन सोसायटी, कृष्ण मंदिर समोर नव्याने झालेल्या कॉलनी मध्ये शंभुराजे कॉलनी नं. १, शंभुराजे कॉलनी नं. २, शंभुराजे कॉलनी नं. ३, शंभुराजे कॉलनी नं. ४, शंभुराजे कॉलनी नं. ५ या प्रमाणे नामकरण देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १० | विषय क्रमांक | : | ४ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा.गीता मंचरकर | अनुमोदक | : | मा.समीर मासूळकर |

संदर्भ : मा.अश्विनी संतोष जाधव यांचे दि. ०७/०८/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

बालघरे वस्तीमधील रस्त्यास "कोंडिबा भाऊ बालघरे मार्ग" व चिखली मोशी २४ मीटर रता व १८ रस्ता मिळतात तेथील चौकास "कै.निवृत्ती नारायण जाधव चौक" असे नामकरण करणेस तसेच चिडोबा म्हसोबा मंदिर कुदळवाडी असा नामफलक सदर मंदिराचे ठिकाणी लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ११ | विषय क्रमांक | : | ५ |
| दिनांक | : | ०४/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा.राहुल हनुमंतराव भोसले | अनुमोदक | : | मा.समीर मासुळकर |

संदर्भ : मा. राहुल हनुमंतराव भोसले यांचे दि. ०७/०८/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र.९ मधील खराळवाडी उर्दू शाळेजवळील नाल्यावरील सार्वजनिक मुतारी ही धोकादायक असून मा.आयुक्त यांनी वॉर्ड भेटी दरम्यान सदर मिळकत पाडून टाकण्यात यावी अशी सूचना दिलेली असल्याने सदर सार्वजनिक मुतारी पाडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(बोइनवाड यशोदा प्रकाश)
सभापती (क प्रभाग समिती)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय कार्यालय

पिं.चिं. मनपा, क क्षेत्रीय कार्यालय
जा.क्र. कक्षेका/सभा/कावि/ ११४ /२०१९
दिनांक : २४ /०९/२०१९
प्रत: सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतामधील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.